# व्यापार चक्र (Trade Cycle)

- बी.कॉम भाग १
- विषय:-व्यावसायिक अर्थशास्त्र
- डॉ.सौ.पुष्पा सुभाष तायडे
- प्राचार्य
- लोक महाविद्यालय,वर्धा

# व्यापार चक्र (Trade Cycle)

- अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारचे आर्थिक बदल घडून येत असतात. त्यापैकी काही बदल सतत घडून येतात तर काही बदल अनियमित असतात. काही बदलाचा परिणाम दिर्घकाळ टिकतो. तर काही बदलांचा परिणाम अल्पकाळ टिकतो. आर्थिक बदल घडून येण्यास अनेक घटक कारणीभूत असतात. काही घटक अल्पकालीन तर काही दिर्घकालीन असतात. काही वारंवार उद्भवणारे तर काही अनियमित उद्भवणारे असतात. या बदलांमुळे अर्थव्यवस्थेत उच्चयावचने निर्माण होतात. घटकांच्या स्वरूपावरून उच्चयावचनाचे प्रकार सांगता येतात.

# उच्चावचनाचे वर्गीकरण

- उच्चावचने चार प्रकारची असतात.
- १. दीर्घकालीन प्रवृत्ती (Secular Trend)
- २. हंगामे उच्चावचने (seasonal fluctuations)
- ३. चक्रीय उच्चावचने (Cyclical fluctuations)
- ४. आकस्मिक किंवा अनियमित उच्चावचने (Random fluctuations)
- यापैकी दीर्घकालीन प्रवृत्ती व चक्रीय उच्चावचने दीर्घकालीन घटकामुळे घडून येतात. तर हंगामी उच्चावचने व आकस्मिक उच्चावचने अल्पकालीन घटकामुळे घडून येतात.

# दीर्घकालीन प्रवृत्ती (Secular Trend)

- व्याख्या – प्रा.जे.ए. इस्टे – दीर्घकालीन प्रवृत्ती म्हणजे व्यापार चक्रापेक्षा अधिक दीर्घकाळपर्यंत एखाद्या क्रियेसंबंधीच्या समंकात योग्य दिशेने अखंड व अव्याहत पणे घडून येणारे बदल होत.
- A trend may be defined as a continued and continuous movement of the data of any activities in a recognizable direction over a period of time that is long relative to the business cycle. J.A. Estey.

# दीर्घकालीन प्रवृत्तीचे प्रकार

- दीर्घकालीन प्रवृत्तीचे दोन प्रकार पडतात.
- १. रेखीय प्रवृत्ती
- २. अरेखीय प्रवृत्ती

# दीर्घकालीन प्रवृत्तीचे महत्व

- १. भूतकाळातील वर्तणूकीचा अभ्यास याप्रवृत्तीवरून करता येतो. भूतकाळात सारणीमध्ये जी वैशिष्टये दिसून येतात. त्यावरून आपणास वाढीच्या किंवा घटीच्या प्रवृत्तीचे अध्ययन करता येते.
- २. ज्या घटकामुळे चक्रीय हंगामे आणि अनियमित उच्चावचने घडून येतात त्या घटकातील परिवर्तनाचे अध्ययन करता येते.
- ३. प्रवृत्तीच्या अध्ययनावरून दोन किंवा अधिक कालखंडातील कालामालेतील तुलना करता येते.
- ४. प्रवृत्तीच्या अध्ययनावरून बाह्य गणन करता येते.

# हंगामे उच्चावचने (seasonal fluctuations)

- व्याख्या – हंगामी बदल ऋतूमानाच्या निश्चित लयबद्धतेमुळे व्यवसायावर लादले जातात. व कालावधीची निश्चितता त्यात दिसून येते.
- Seasonal fluctuations are imposed upon business by the fixed rhythm of seasons and are characterized by a recognised periodicity in time. J.A. Estey

# हंगामी बदलाची कारणे

१. नैसर्गिक शक्तीमुळे घडून येणारे बदल.
२. मानवनिर्मित प्रथांमुळे घडून येणारे बदल.

# हंगामी बदलाचे महत्व

१. अल्पकालीन समय सारणीतील हंगामी आकृती बदलांचे विश्लेषण करणे.
२. दीर्घकालीन प्रवृत्तीच्या आधारे पुर्वानूमान केलेल्या मूल्याबाबतो समायोजन हंगामी बदलामुळे करता येते.
३. एखादा हंगामी घटक माहित असेल तर त्याच्या आधारे चक्रीय व अनियमित बदल वेगळे करता येतात.
४. व्यावसायीक तथ्याच्या मूल्यमापनासाठी हंगामी बदलाचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.
५. वस्तू व सेवांच्या किंमत निर्धारणासाठी हंगामी घटकांचा उपयोग केला जातो.
६. हंगामी बदलावरून भविष्यकालीन क्रियांचे नियोजन करता येते. खरेदी, उत्पादन, संग्रहन, नियंत्रण याविषयीचे धोरण ठरविता येते.

# चक्रीय उच्चावचने (Cyclical fluctuations)

- चक्रीय उच्चावचनांना व्यापार चक्र म्हटल्या जाते.
- व्याख्या – लिंकन चाओच्या मते, चक्रीय उच्चावचने म्हणजे वरच्या किंवा खालच्या दिशेने घडून येणारी हंगामी बदलापेक्षा भिन्न व दीर्घकाळ टिकून राहणारी साधारणपणे दोन किंवा जास्त वर्षांच्या कालावधीची असतात.
- The cyclical variations have been define as up and down movements which are different from seasonal fluctuations in that they extend over longer period of time usually two or more years. Lincon Chao.

# व्यापार चक्राच्या अवस्था

१. तेजी
२. घसरण
३. मंदी
४. पूनरूत्थान

# तेजी व मंदी

- मंदी – प्रा.हेर्बलर – मंदी म्हणजे व्यापार चक्राची अशी अवस्था होय की, जेव्हा वास्तविक उपभोगलेले उत्पन्न वास्तविक उत्पादित झालेले उत्पन्न आणि रोजगाराची पातळी कमी असते किंवा घटते आणि उत्पादकाचे घटक निकामे असतात. किंवा श्रमिक बेरोजगार असतात किंवा अतिरिक्त क्षमता अस्तित्वात असते.
- तेजी – प्रा.हेर्बलर – तेजी म्हणजे व्यापार चक्राची अशी अवस्था होय की, जेव्हा वास्तविक उपभोगलेले उत्पन्न वास्तविक उत्पादित झालेले उत्पन्न आणि रोजगाराची पातळी जास्त असते किंवा वाढते आणि उत्पादकाचे घटक निकामे नसतात. किंवा श्रमिक बेरोजगार नसतात किंवा अतिरिक्त क्षमता अस्तित्वात नसते.

# व्यापार चक्र अस्तित्वात येण्याची कारणे

१. रोजगार
२. वास्तविक उपभोगलेले उत्पन्न
३. वास्तविक उत्पादित उत्पन्न

# आकस्मिक किंवा अनियमित उच्चावचने (Random fluctuations)

- ज्या बदलाविषयी पूर्वानुमान करता येत नाही अश्या बदलांना आकस्मिक उच्चावचने म्हणतात.
- अनेक प्रकारच्या आकस्मिक घटकांमुळे आकस्मिक उच्चावचने घडून येतात.
- आग, पूर, वादळ, युध्दे, भूकंप, संप, ताळेबंदी, दुष्काळ, साथीचे रोग, क्रांती, वैधानिक बदल, न्यायिक निर्णय इत्यादींचा आर्थिक क्रियांवर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घडून येतो.